शासन मान्यता प्राप्त "निकडीचे सार्वजनिक प्रकल्प (Vital Public Projects)" या प्रकल्पांकरीता संबंधित प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा संबंधित प्रकल्प राबविणाऱ्या यंत्रणेस देण्याबाबत................

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०१५/प्र.क्र.४५/ज-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक: १ जून, २०१७**

वाचा :-

१. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१
२. शासन परिपत्रक क्र.एलएनडी-१०७१/१८३७३६/एआयआय, दि.९ सप्टेंबर,१९७१ व दि. २५ फेब्रुवारी,१९७२
३. शासन परिपत्रक क्र. जमीन-४९७९/ २९९०४/ सी.आर.५३४/ग-८, दि. १० मार्च, १९८६
४. शासन परिपत्रक क्र.जमीन-१०/२००५/ प्र.क्र.३७/ ज-१, दि. ७ एप्रिल, २००५,
५. शासन निर्णय क्र. जमीन-१०/२००५/प्र.क्र.३८/ज -१, दि. ७ मार्च, २००६
६. शासन परिपत्रक क्र. जमीन-०४/२००६/प्र.क्र.३५/ज-१, दि. ८.सप्टेबर, २००८
७. शासन परिपत्रक क्र. जमीन-०५/२००८/प्र.क्र.८८/ज-१, दि. १८जून, २०११,
८. शासन निर्णय क्र. जमीन-०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१, दि. २७ जुलै, २०११,
९. शासन परिपत्रक क्र. जमीन-०९/२०१२/प्र.क्र.७९/ज-१, दि. ३० नोव्हेंबर,२०१२
१०.शासन परिपत्रक क्र. जमीन-०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१, दि. १३ जून, २०१३
११.शासन निर्णय क्र. जमीन-२०१५/प्र.क्र.४५/ज-१, दि. १ जून, २०१५

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४० आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ३,५ व ६ मधील तरतूदी अन्वये शासकीय जमिनी राज्य शासनाच्या विविध विभागांना सार्वजनिक प्रयोजनांसाठी प्रदान करण्यात येतात.

राज्यामध्ये विविध भागात राज्य शासनामार्फत सार्वजनिक महत्वाचे प्रकल्प राबविण्यात येतात. या महत्वाच्या प्रकल्पांकरिता शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रके निर्गमित केलेली आहेत. तथापि, महसूल विभागाकडील शासकीय जमिनी व्यतिरिक्त राज्य शासनाच्या इतर प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखाली/व्यवस्थापनाखाली असलेल्या शासकीय जमिनी देखील काही वेळा राज्य शासनाच्या महत्वाच्या प्रकल्पांकरिता आवश्यक

असतात व त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाकडून ना-हरकत/सहमती प्राप्त करुन घेणे आवश्यक असते.

अनेकदा राज्य शासनाच्या महत्वाच्या प्रकल्पासाठी महसूल विभागा व्यतिरिक्त इतर शासकीय विभागाच्या अधिपत्याखाली /व्यवस्थापनाखाली असलेल्या जमिनीची आवश्यकता भासल्यास संबंधित प्रशासकीय विभागाकडून ना-हरकत/संमती प्राप्त करुन घेण्यास बराच कालावधी लागतो. त्यामुळे जमीन वेळीच उपलब्ध करुन न दिल्यास कालापव्यय होऊन सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये विलंब होऊ शकतो व अशा परिस्थितीत अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीचा वेळेत वापर न होता तो अखर्चीत पडून राहू शकते किंवा परत करण्याची वेळ येऊ शकते. त्याचप्रमाणे प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात व तसे झाल्यास प्रकल्पाच्या अंदाजपत्रकीय खर्चात वाढ होऊ शकते.

याचा विचार करता राज्य शासनाच्या **प्रशासकीय मान्यता प्राप्त** महत्वाचे प्रकल्प राबविणाऱ्या शासकीय यंत्रणेस विविध शासकीय विभागांच्या अधिपत्याखालील/व्यवस्थापनाखालील शासकीय जमिनीची आवश्यकता भासल्यास अशा शासकीय जमिनीचा आगावू ताबा संबंधित प्रशासकीय विभागांनी संबंधित प्रकल्प राबविणा-या शासकीय / निमशासकीय यंत्रणेच्या सक्षम प्राधिका-याकडे परस्पर सुपूर्द करण्याबाबत सुस्पष्ट धोरण व कार्यपध्दती ठरविणे आवश्यक आहे. यास्तव राज्य मंत्रिमंडळाने किंवा मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या महत्त्वाच्या प्रकल्पांना आवश्यक शासकीय जमिनींचा आगावू ताबा देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत *दि.१६/०५/२०१७* रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीतील मान्यतेस अनुसरून शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

राज्य **मंत्रिमंडळाने किंवा मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या मान्यतेच्या** अनुषंगाने शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेले सार्वजनिक वाहतूकीशी निगडीत मोठे प्रकल्प (उदा. मेट्रो प्रकल्प/मोनो रेल प्रकल्प, रेल्वे प्रकल्प, विमानतळ प्रकल्प, बंदर विकास प्रकल्प, राष्ट्रीय किंवा राज्य महामार्ग व द्रुतगती मार्ग प्रकल्प) तसेच मोठे/ मध्यम सिंचन प्रकल्प व जलविद्युत प्रकल्प, मोठे पाणी पुरवठा प्रकल्प, राज्याच्या प्रचलित पर्यटन धोरणांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे किंवा पर्यटन संचालनालयाचे मोठे पर्यटन प्रकल्प व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत विकसित करावयाचे औद्योगिक क्षेत्र (यापुढे ज्यांचा सामाईक उल्लेख **निकडीचे सार्वजनिक प्रकल्प** म्हणून करण्यात आला आहे) राबविणा-या प्रशासकीय विभागास शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील/ व्यवस्थापनाखालील शासकीय जमिनीची आवश्यकता भासल्यास व अशा शासकीय जमिनीची मागणी प्रकल्प राबविणा-या विभागाने केल्यास, प्रकल्प राबविणा-या विभागास किंवा प्रकल्प राबविणा-या विभागाने नामनिर्देशित केलेल्या शासकीय/निमशासकीय यंत्रणेस संबंधित शासकीय जमिनीचा परस्पर आगावू ताबा देण्यासंदर्भात शासन या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे **दिशा निर्देश** निर्गमित करीत आहे :-

०१. राज्य मंत्रिमंडळाने किंवा मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेले उक्त नमूद **निकडीचे सार्वजनिक प्रकल्प** राबविणाऱ्या प्रशासकीय विभागास शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील/ व्यवस्थापनाखालील शासकीय जमिनीची आवश्यकता भासल्यास व अशा शासकीय जमिनीची मागणी प्रकल्प राबविणा-या विभागाने केल्यास, प्रकल्प राबविणा-या विभागास किंवा प्रकल्प राबविणाऱ्या विभागाने नामनिर्देशित केलेल्या शासकीय/निमशासकीय यंत्रणेस संबंधित शासकीय जमिनीचा परस्पर आगावू ताबा जमीन धारण करणाऱ्या विभागाने संबंधित **जिल्हाधिकाऱ्यामार्फत** पुढील कार्यपध्दतीस व अटीस अनुसरुन **विहित वेळेत** देणे बंधनकारक राहील:-

<u>अ) कार्यपध्दती :-</u>

I. प्रकल्प राबविणा-या विभागाने, ज्या अन्य संबंधित प्रशासकीय विभागाची जमीन आवश्यक आहे त्या विभागास संबंधित निकडीच्या सार्वजनिक प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यते संदर्भातील शासनाच्या निर्णयाची प्रत, संबंधित शासकीय जमीन सदर प्रकल्पासाठी आवश्यक व अपरिहार्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र, आगाऊ ताबा ज्या क्षेत्रिय प्राधिका-याकडे देणे अपेक्षित आहे त्याचे नामनिर्देशन व अशी जमीन वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.

II. अशा प्रकारे जमीन वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावावर प्रशासकीय विभाग प्रमुखांनी, म्हणजेच जमीन धारण करणा-या विभागाच्या **अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव** यांनी प्रकल्प राबविणा-या विभागाने सादर केलेला शासन निर्णय व अशा प्रस्तावांतर्गत कागदपत्रे त्यांच्या विभागाच्या अधिपत्याखालील संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना पाठविण्याची कार्यवाही वरीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून <u>जास्तीत जास्त ३० दिवसांत</u> करणे आणि प्रकल्पाच्या प्रशासकीय मंजूरीच्या आदेशातील अटी/शर्ती सापेक्ष अशा जमिनीचा आगाऊ ताबा देण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत त्यांच्या अधिनस्त जिल्हास्तरीय क्षेत्रिय अधिका-याला व संबंधित जिल्हाधिका-यांना कळविण्याची कार्यवाही करणे **अनिवार्य** असेल. निकडीच्या सार्वजनिक प्रकल्पास शासन निर्णयान्वये शासनाने पूर्वीच मान्यता दिली असल्याने त्यासाठी आवश्यक जमिनीचा आगाऊ ताबा देण्याविषयी निर्देश संबंधित जिल्हास्तरीय क्षेत्रिय अधिकारी व जिल्हाधिकारी यांना देण्यासाठी जमीन धारण करणा--या शासकीय विभागाच्या **अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांना परत शासनादेश प्राप्त करण्याची गरज असणार नाही.**

III. वरील प्रमाणे आगाऊ ताबा विषयी पत्र प्राप्त झाल्यावर जिल्हाधिकारी यांनी तात्काळ प्रकल्प राबविणा-या विभागाने आगाऊ ताब्यासाठी नामनिर्देशित केलेला प्राधिकारी

व संबंधित जमीन धारण करणा-या विभागाचा जिल्हास्तरीय प्रमुख अधिकारी या दोघांशी विचार विनिमय करुन अशा जमिनीच्या संयुक्त मोजणीची तारीख ठरवावी व अविलंब मोजणी पूर्ण करुन घेवून अशा जमिनीचा आगाऊ ताबा जमीन धारण करणा-या विभागाच्या जिल्हास्तरीय अधिका-याकडून घेऊन प्रकल्प राबविणा-या विभागाने नामनिर्देशित केलेल्या प्राधिका-याकडे शक्यतो त्याचवेळी सुपूर्द करण्याची व्यवस्था करावी. याकामी शासकीय जमिनीची संयुक्त मोजणी **विनाशुल्क** करण्यात यावी. या प्रमाणे आगाऊ ताबा देण्याची कार्यवाही जिल्हाधिका-याकडे शासनाच्या जमीन धारण करणा-या विभागाकडून पत्र प्राप्त झाल्यानंतर **३० दिवसांच्या** आत पूर्ण करणे आवश्यक राहील.

IV. वरीलप्रमाणे विहित पध्दतीने शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा प्रकल्प राबविणा-या विभागाने नामनिर्देशित केलेल्या प्राधिका-याकडे सुपूर्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांनी शासनाच्या संबंधित विभागांकडे सादर करणे आवश्यक राहील. तद्नंतर संबंधित जमीन धारण करणाऱ्या विभागाच्या जिल्हास्तरीय प्रमुखाने अशी जमीन सदर प्रकल्पाकरिता प्रकल्प राबविणा-या विभागाकडे ***अंतिमत: वर्ग करण्याचा*** रितसर प्रस्ताव जमीन धारण करणाऱ्या प्रशासकीय विभागास **१ महिन्याच्या** आत न चूकता सादर करण्याची दक्षता घ्यावी.

V. वरीलप्रमाणे जमीन अंतिमत: वर्ग करण्यासंबंधी रितसर प्राप्त झालेल्या प्रस्तावावर संबंधित प्रशासकीय विभागाने अशी जमीन ज्या अधिनियमाद्वारे नियंत्रित केली जाते (उदा. महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास अधिनियम-१९७६, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम, १९६१, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६ इत्यादी) अशा अधिनियमातील तरतूदीन्वये विहित कार्यवाही पूर्ण करुन सदर जमीन प्रकल्प राबविणा-या विभागाकडे किंवा अशा विभागाने नामनिर्देशित केलेल्या शासकीय /निमशासकीय यंत्रणेकडे अंतिमत: वर्ग करण्यासंबंधीचे आदेश विनाविलंब निर्गमित करावेत. जमीन निर्गतीबाबत संबंधित प्रशासकीय विभागाकडे विशिष्ट अधिनियम/तरतूदी उपलब्ध नसल्यास विभागाने अशी जमीन अंतिमरित्या निर्गत करण्याबाबतचा प्रस्ताव महसूल विभागाला स्वयंस्पष्ट शिफारशीसह व जमीन प्रत्यार्पणाच्या आदेशासह सादर करावा व त्या आधारे महसूल व वन विभागाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतूदीन्वये अशी जमीन प्रकल्प राबविणा-या विभागाकडे अंतिमत: वर्ग करण्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत.

<u>ब) अटी व शर्ती</u>:- **वरील निर्देशांप्रमाणे कार्यवाही करताना खालील अटी व शर्तींचे अनुपालन होणे बंधनकारक राहील:-**

I. प्रकल्प राबविणाऱ्या संबंधित प्रशासकीय विभागाने, अशा निकडीच्या सार्वजनिक प्रकल्पास **राज्य मंत्रिमंडळाची किंवा मंत्रिमंडळ उपसमितीची मान्यता** घेतलेली असावी आणि त्या आधारे राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त केलेली असावी.

II. प्रशासकीय मान्यता प्राप्त निकडीच्या सार्वजनिक प्रकल्पासाठी आवश्यक शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देताना **संबंधित प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील नमूद जमिनीचे भोगवटामूल्य व इतर बाबींशी संबंधित अटी व शर्तीनुसारच आगाऊ ताबा देणे आवश्यक राहील**. विशेष म्हणजे अशा शासकीय जमिनीवर त्रयस्थ हितसंबंध निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने किंवा मंत्रिमंडळ उपसमितीने मान्यता दिली असेल तरच त्यानुसार त्रयस्थ हक्क अशा शासकीय जमिनीवर निर्माण करण्यास मुभा राहील. ज्या प्रकरणी भोगवटा मूल्य वसूल करण्यासंबंधी प्रशासकीय मान्यता आदेशात स्पष्टता नसेल अशा प्रकरणामध्ये महसूल विभागाने निश्चित केलेले धोरण विचारात घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक राहील.

III. प्रकल्प राबविणारा विभाग यांनी सदर प्रकल्प कोणत्या यंत्रणेमार्फत राबविण्यात येणार आहे, तसेच अशा प्रकल्पासाठी किती शासकीय जमीन प्रकल्प राबविणा-या विभागास किंवा प्रकल्प राबविणा-या विभागाने नामनिर्देशित केलेल्या शासकीय /निमशासकीय यंत्रणेस आवश्यक आहे या बाबीस देखील मंत्रिमंडळाची किंवा यथास्थिती मंत्रिमंडळ उपसमितीची मान्यता घेतलेली असावी.

०२. सार्वजनिक निकडीचा प्रकल्प राबविणाऱ्या विभागाने अशा प्रकल्पासाठी अन्य प्रशासकीय विभागांच्या ताब्यातील जमीन आवश्यक असल्यास प्रकल्प मंजूरीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे किंवा यथास्थिती मंत्रिमंडळ उपसमितीपुढे सादर करण्यापूर्वी संबंधित प्रशासकीय विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे. एखाद्या प्रकरणी अशा प्रकल्पास मंत्रिमंडळ/मंत्रिमंडळ उपसमितीची मान्यता घेताना संबंधित प्रशासकीय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले नसतील आणि अशा प्रशासकीय विभागास **काही न्यायालयीन किंवा वैधानिक किंवा अन्य समर्थनीय कारणास्तव अशा प्रकल्पासाठी आवश्यक आपली जमीन उपलब्ध करुन देणे शक्य होत नसेल तर अशा प्रकरणी पूर्ण समर्थनासह आपले अभिप्राय अशा प्रशासकीय विभागाच्या अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांनी जमीन वर्ग करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या विभागाच्या प्रभारी मंत्री यांची मान्यता घेऊन मुख्य सचिव यांच्यामार्फत मा.मुख्यमंत्री यांच्या अंतिम आदेशार्थ सादर करणे बंधनकारक राहील.**

०३. ज्या निकडीच्या सार्वजनिक प्रकल्पांना यापूर्वीच मंत्रिमंडळ किंवा मंत्रिमंडळ उपसमितीने मान्यता दिली असून अद्याप शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा प्राप्त झाला नसेल अशा प्रकल्पांना ही प्रस्तुत धोरण लागू राहील.

०४. अशासकीय /खाजगी/धर्मादाय संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या प्रकल्पासाठी शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा या धोरणान्वये देण्यात येऊ नये.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४०५/२०१५/व्यय-९, दि. ३०/०९/२०१५ अन्वये तसेच मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०६०११४३७३२६९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manu Kumar Srivastava

Digitally signed by Manu Kumar Srivastava
DN: c=IN, o=All India Services, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Manu Kumar Srivastava
Date: 2017.06.01 20:15:00 +05'30'

**(मनु कुमार श्रीवास्तव)**
**प्रधान सचिव ( महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी )**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
७) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
८) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई.
१२) प्रधान सचिव, (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव (उर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
१६) सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) सचिव (वने व भूसंपादन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१९) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२२) सर्व मंत्रालयीन प्रशासकिय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) सर्व विभागीय आयुक्त.
२४) सर्व जिल्हाधिकारी.
२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२६) निवासी लेखाधिकारी, मुंबई.
२७) सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८) सर्व "ज" समूह कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९) निवड नस्ती (कार्यासन ज-१).

******